ॐ

# अध्याय चौथा

१ श्रीकृष्ण म्हणे, ‘अविनाशी हा योग बोलिलों रवितें
रविनें मनुतें सांगितला तो मनुनें इक्ष्वाकूतें १

२ परंपरेनें असा जाणिला अनेक राजर्षीनीं
परी लोपला पुढें इथे बहु काळ लोटला म्हणुनी २

कीं ते प्राणी जन्म पावुनी केवळ विषयासक्त
मूढ जाहले म्हणुनि विसरले आत्म-बोध निभ्रांत ३

विवेक नाहीं न देखिली हि वैराग्याची शींव
सर्वतोपरी मोहांत असा बुडुनी गेला जीव ४

पसरे साचा अज्ञानाचा इथे गाढ अंधार
पहा संप्रति कर्म-योग हा लोपुनि गेला पार ! ५

३ तो चि पुरातन योग तुज असा कथिला पार्था, आज
भक्त तसा तूं सखा हि माझा आणि थोर हें गूज ! ६

रणघाई ही तरी क्षणभरी तीहि टाकुनी मागें
मजसी आधीं अज्ञान तुझें दूर करावें लागे.' ७

४ असें परिसुनी पार्थ विस्मयें पुसे, 'द्वारकाधिपते,
कल्पारंभीं कसा वर्णिला तूं चि योग हा रवितें ? ८

कीं पूर्वींचा जन्म रवीचा तुझा तरी सांप्रतचा
म्हणुनी कृष्णा, मज होईना निर्णय तव करणीचा.' ९

५ 'अनेक माझे तसे तुझे हि जन्म होउनी गेले
ते मी जाणें सर्व' हरि म्हणे, 'न तूं जाणसी अपुले. १०

स्मरें जन्म ते सर्व हि येथें 'ईशत्वें' वावरुनी
परी अर्जुना, तुज स्मरण ना 'जीवत्व-दशा' म्हणुनी ११

६ अज अविकारी जगत्-प्रभु तरी निज-प्रकृति वेढून
माया-योगें जगीं संभवें जणुं रूपा येऊन १२

न मोडितां ती स्वतंत्रता निज धनंजया निःसंगी
अमूर्त असुनी पहा अवतरें जगांत कार्यालागीं १३

७ ज्या ज्या कालीं इथे भू-तलीं होते धर्म-ग्लानि
अधर्म पसरे तदा अवतरें सगुण-रूप घेवोनी १४

८ साधु-जनांतें संरक्षाया दुष्टां दूर कराया
जन्मतों जगीं मी युगायुगीं धर्म पुन्हां स्थापाया १५

पाप नाशुनी जनां दाखवीं धर्म आणखीं नीति
संतांहातीं आत्म-सुखाची गुढी उभारीं जगतीं १६

आणि साधकांकरवीं डंका झडवीं वैराग्याचा
विवेक-दीपा उजळुनि सोपा करीं मार्ग मुक्तीचा १७
करुनि अकर्ता असें तत्त्वतां जन्मूनी हि अजन्मा
जगदुद्धरणास्तव मी नामी होतों असुनि अनामा १८
९ ह्यापरि माझें जन्म-कर्म हें दिव्य तत्त्वतां जाणे
तो मज पावे तया स्वभावें पुन्हा न जन्मा येणें १९
१० तपो-बळें जे निर्मळ झाले जाणुनियां हें ज्ञान
काम-क्रोधांपासुनि सुटले निर्भयता लाहून २०
मदाश्रयें जे संतत मातें भजले तन्मय-चित्तें
संत असे ते बहुत पावते झाले मद्रूपातें २१
तूं हि अर्जुना, आत्म-ज्ञाना होउनियां अधिकारी
निज-कर्म करीं नित्य रंगुनी मद्रूपीं अविकारी २२
११ भजती मातें नर जे जैसे मी हि तसा चि तयांतें
सकळ सर्वथा पार्था, माझ्या अनुसरती मार्गातें २३
कसे हि भजले न च वा भजले तरी तयां आधार
मी चि एकला असें उमजला तो होतो भव-पार २४
१२ परि अविवेकी अजाण एकीं अनेकत्व कल्पून
मज सर्वज्ञा-परमात्म्यातें सर्वथैव विसरून २५
मानुनि नाना देवता-गणां विधि-पूर्वक जे यजिती
तयां जगीं ह्या त्वरित वांछिलीं कर्मफळें तीं मिळती २६

परी तयातें देतें घेतें आणिक नाहीं कोणी
जशी भावना तशीं अर्जुना फळें पावती प्राणी २७
नाशिवंत तीं सुखें तयांचीं कीं क्षणभंगुर भोग
जाणुनि मातें योग-बळें तूं अक्षय सुख तें भोग २८
असे जाणते अलिप्त-चित्तें स्व-कर्म जे आचरिती
जाण तयांतें निश्चित होते मद्रूपाची प्राप्ति २९
१३ तीं गुण-कर्में विभागुनी मी वर्ण निर्मिले चारी
करीं सर्व हें तरि तूं पाहें अकर्ता चि अविकारी ३०
ज्या जीवाचा स्वभाव जैसा तसा तयाचा वर्ण
मुळांत एक चि परि गुण-भेदें चतुर्विध असे जाण ३१
यथा-वर्ण जें विहित कर्म तें तया दिलें नेमून
लोक-संग्रहास्तव सांगितलें तुज हें विशद करून ३२
१४ कर्म-मात्र तें न शिवे मातें कर्म-फलीं न च आस
जाणे जो मज असा तयासी न च कर्माचे फांस ३३
१५ तत्त्व जाणुनी मुमुक्षुनीं हि पाहा पूर्वकालीन
कर्म-द्वारा मोक्ष साधिला निर्मळ चित्त करून ३४
तरी जसे ते करीत आले कर्में पूर्वापार
तूं हि तशीं तीं करीं अर्जुना, जाणुनि हें साचार ३५
१६ कर्म कोणतें कीं अकर्म तें कशासि केव्हां म्हणती
इथे तत्त्वतां निर्णय करितां जाणतेहि गोंधळती ३६

कर्म-तत्त्व तें कथितों तूतें ऐक चित्त देऊन
जाणितां चि जें पार्था, सहजें सुटशिल अशुभांतून ३७

१७ कसें स्वभावें कर्म असे तें वि-कर्म तेंहि कवण
जाणुनि घ्यावें अ-कर्म तें हि कीं कर्म-गती गहन ३८

तरी 'कर्म' तें सहज संभवे जेणें विश्वाकार
वर्ण-विशेषें विहित कर्म तें 'वि-कर्म' शास्त्राधार ३९

'अ-कर्म' म्हणतां कर्म-शून्यता न ती पहा साचार
ब्रह्मार्पण जें कर्म सकल तें 'अ-कर्म' हा निर्धार ४०

१८ नर जो कर्मीं अकर्म पाहे आणि अकर्मीं कर्म
सर्व-कर्म-कृत् ज्ञाता जाणे तो योगाचें वर्म ४१

जो साक्षित्वें करुनी कर्में स्वयें वेगळा राहे
तो चि ज्ञाता सहजें कर्मीं अकर्मत्व तें पाहे ४२

न चालतां रवि दिसे चालता आकाशाच्या खोपीं
तेविं अकर्त्या आत्म्यातें जो पाहे कर्मारोपीं ४३

१९ नसे अपेक्षा फलीं जयाची सकल हि कर्में करितां
'मी कर्ता, हें करीन' न शिवे संकल्प असा चित्ता ४४

ज्ञानाग्नीनें अशीं जयाचीं कर्में जळुनी जाती
सुजाण नर ते त्या पुरुषातें 'पण्डित' ऐसें म्हणती ४५

२० त्यजी फलाशा निराश्रय असा असे नित्य-संतृप्त
कर्में करितां तरी अकर्ता तो चि जाण निभ्रांत ४६

२१ त्यजीं परिग्रह सर्व, संयमी निरिच्छ निज-संतोषी
करो शरीरें सुखें कर्म तो तरी न होतो दोषी ४७

२२ आणि मिळे तें गोड मानितो जो निर्मत्सर झाला
सुख-दुःखादि द्वन्द्वें तीं ना स्पर्शूं शकती ज्याला ४८
मिळो यश तसें न मिळो तेथें असे सदा सम-भावें
जरी आचरे कर्म सकल तो कर्म-बंध न च पावे ४९

२३ कर्म-बंध-निर्मुक्त असा जो स्थिर परमात्म-ज्ञानीं
संग सोडुनी कर्म आचरे यज्ञोपासन म्हणुनी ५०
तरी तयाचें सकल कर्म तें ब्रह्मीं होतें लीन
कीं अवतरलें मनुष्य-वेषें ब्रह्म चि तें परिपूर्ण ! ५१

२४ अग्नि ब्रह्म स्त्रुक्-स्त्रुवादि जें अर्पण तें हि ब्रह्म
हवन-द्रव्य ब्रह्म चि यजिता ब्रह्म सकलही कर्म ५२
असें स्वभावें समत्व-भावें कर्म ब्रह्म चि होतां
तयातें गति ब्रह्मापरती नसे अन्यथा पार्था ५३

२५ दुसरे कोणी योगी-जन ते दैव-यज्ञ आचरिती
अग्नींद्रादिक देव-देवता-पूजन भावें करिती ५४
आणि अन्य ते ब्रह्माग्नीतें प्रदिप्त करुनी तेथें
सोऽहं-भावें पहा जाळिती कोणी जीव-दशेतें ५५

२६ सर्व इंद्रियें तशीं होमिती कुणी संयमाग्नींत
ते आवरिती प्रत्याहारें इंद्रिय-वृत्ति त्वरित ५६

शब्दादिक ते विषय होमिती कुणी इंद्रियाग्नींत
विधि-पूर्वक ते विषय इंद्रियां देती सावध-चित्त ५७
२७ आत्मसंयमन-योगाग्नि कुणी ज्ञानें करुनी दीप्त
तीं प्राणेंद्रिय-कर्में सर्व हि पहा होमिती त्यांत ५८
२८ योगें कोणी तसे जप-तपें द्रव्य अर्पुनी कोणी
कोणी ज्ञानें यजिती चि यती व्रतें प्रखर राखोनी ५९
२९ प्राण अपानीं पहा होमिती तसा अपान प्राणीं
प्राणापान-भ्रमण रोधुनी प्राणायामी कोणी ६०
३० नियताहारी कुणी होमिती प्राण चि तो प्राणांत
असे यज्ञविद् सर्वहि होती यज्ञें पाप-विमुक्त ! ६१
३१ असो सकळ हे याज्ञिक पाहें मोक्ष-कामना चित्तीं
धरुनि अविद्याजात जाळुनी राहे जें यज्ञान्तीं ६२
समत्व-भावें जिथें संपतें यजिता-यज्ञ-विधान
अनादि-सिद्ध स्वभाव-शुद्ध द्वैतविरहित ज्ञान ६३
तें चि सेविती अमृत पावती म्हणुनि शाश्वत ब्रह्म
ब्रह्म-निष्ठ ते ह्यास्तव होतें ब्रह्मार्पण तत्कर्म ६४
परी जन्मुनी संयमनाग्नी न सेविती अविवेकी
श्रेय तयांतें न च ह्या लोकीं मग कोठुनि परलोकीं ? ६५
३२ असे यज्ञ हे अनेक पाहें माया-ब्रह्मीं होती
कर्म-ज सारे असे जाणुनी पावशील तूं मुक्ति ६६

३३ द्रव्य-यज्ञ जो त्याहुनि बरवा ज्ञान-यज्ञ कल्याणीं
सर्व कर्म तें समाप्त होतें पार्था, आत्म-ज्ञानीं ! ६७
स्वयें विसरती विषय-संगति जिथें इंद्रियें सर्व
मन हारपतें जिथे संपते बुद्धीचीही धांव ६८
प्रवृत्ति झाली लुळी पांगळी तर्क आंधळा ठरला
विवेकासवें वैराग्याचा पांग सर्वथा फिटला ६९
बोल थांबती जिथे पावती सर्व साधनें तृप्ति
न पाहतां हि सहजें होई आपआपणां भेटी ७०
३४ तें चि पांडवा, करुनी सेवा संतांलागि पुसावें
विनम्र-भावें तरी स्वभावें सांगतील तुज बरवें ७१
संत विवेकी सत्प्रदीप कीं चिद्रत्नाची खाण
शांति-सुखाची ब्रह्म-रसाची मूर्ति ओतिली जाण ७२
ते स्वानुभवी वैराग्य-रवि प्रसन्न होउनि पूर्ण
सच्छिष्यातें कृपा-कटाक्षें देती आत्म-ज्ञान ७३
३५ ज्ञान पावतां संकल्पांतुनि सुटेल सहजें चित्त
म्हणुनि भारता, पुन्हा न ऐसा गुंतशील मोहांत ७४
ज्ञानें येणें संपूर्णपणें पाहशील आत्म्यांत
भूत-मात्र तें आणि मागुतें तसें चि मद्रूपांत ७५
३६ अखिल पातकी जनांत जरि तूं थोर पातकी असती
ज्ञान-रूप ही नाव घेउनी पाप सकल तें तरसी ७६

३७ प्रदीप्त अग्नि जसा जाळुनी टाकी काष्ठें पूर्ण
ज्ञानाग्नि तसा भस्मसात् करी सर्व हि कर्में जाण ७७

३८ ज्ञानासम तें नसे चि दुसरें पवित्र कीं ह्या जगतीं
यथा-काल तें अंतरीं स्वयें योगी-जन अनुभविती ७८

३९ ब्रह्म-निष्ठ तो ज्ञान पावतो तत्पर संयम-शील
परम शांति मग ती मिळवाया तया न लागे वेळ ७९

४० नसे जयाची श्रद्धा ब्रह्मीं जो मंद-मती मूढ
स्व-हित न च कळे जया न उकले मायेचें हें गूढ ८०

विवेकासवें वैराग्याशीं पुरें जयाचें वैर
जयें आपुलीं सर्व इंद्रियें सदा सोडिलीं स्वैर ८१

आस्था ज्ञानीं नुरे गुंतुनी गेला संदेहांत
पहा तयाचा नाश सर्वथा होतो हातोहात ८२

तरी स्वभावें तो नर पावे इह-पर-लोकीं क्लेश
तया हिताचा शांति-सुखाचा लाभे ना लवलेश ८३

४१ योग साधुनी कर्में करितां त्यजी फलाशा-बंध
आत्म-ज्ञानें टाकि छेदुनी जो संशय-संबंध ८४

संपूर्णपणें ‘अहं’ जयाचें निज-स्वरूपीं विरमे
काय बांधिती तया नरा तीं श्वेत-वाहना, कर्में ? ८५

४२ तरी अविद्या-जन्य संशया तूं निजान्तरांतून
ह्या ज्ञानाच्या खड्ग-लतेनें समूळ उच्छेदून ८६

अखंड योग-स्थित होउनियां निज-कर्तव्या पाहें
पार्था, समरीं शस्त्र घे करीं ऊठ अतां लवलाहें !' ८७

ज्यांत सांगितला ज्ञान-कर्म-संन्यास-योग तो ।
येथें भावार्थ गीतेचा चतुर्थाध्याय संपतो ॥ ४ ॥